# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३०-२२** **दिनांक ०१/०२/२०२२**

## इको चारचाकी वाहनांतील सायलेन्सर चोरी करणा-या टोळीस अटक करुन सायलेन्सर चोरीचे १८ गुन्हे उघडकीस

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विशेषतः वसई-विरार परिसरात इको चारचाकी वाहनाचे सायलेन्सर चोरीच्या गुन्हयात वाढ होत असल्याने वरिष्ठांनी सदर गुन्हयावर आळा बसणे करीता मार्गदर्शनात्मक सुचना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे एक विशेष पथक नेमण्यात आले. त्याप्रमाणे सदर पथकाने अहोरात्र मेहनत करुन तांत्रीक विश्लेषण करुन तसेच गुप्तबातमीदार यांना अशाप्रकारचे चोरी करणारे यांची माहीती तात्काळ देण्याबाबत कळविण्यात आले होते.

दिनांक २३/०१/२०२२ रोजी गुप्त बातमीदार यांचेकडुन अशाप्रकारे गुन्हे करणारे टोळी ही हाटकेश चौक, काशिमिरा येथे येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर पोलीस पथकाने त्याठिकाणी सापळा रचुन १) इम्रान ईरशाद खान वय ३५ वर्षे, २) शाहरुख नसीम खान वय २४ वर्षे, ३) जावेद बशीर खान वय २८ वर्षे सर्व रा. घाटकोपर, मुंबई यांना ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यात असलेल्या पिशव्यांची तपासणी केली असता, त्यामध्ये सायलेन्सरचे पार्ट व ते कटींग करण्याकरिता लागणारे साहीत्य मिळुन आले. त्याअनुषंगाने तपास केला असता आचोळे पोस्टे गुरन ा १३/२०२२ भादंविसक ३७९, ३४ हा गुन्हा उघडकीस आला.

सदर आरोपीत यांचे ताब्यात उक्त नमुद गुन्हयातील चोरीस गेलेला इको वाहनाचे सायलेन्सर व्यतिरिक्त इतर सायलेन्सरचे पार्ट व सायलेन्सर कटींग करणेकारीता आवश्यक असलेले साहीत्य मिळुन आले. त्यामुळे सदरचे आरोपी हे सायलेन्सरचे चोरी करणारे सराईत चोर असल्याची दाट शक्यता वाटल्याने त्यांचेकडुन सदर गुन्हयाच्या कार्यप्रणालीप्रमाणे पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणेमध्ये दाखल असलेले गुन्हयाची उकल होणेकरीता सदरचा गुन्हा मध्यवर्ती गुन्हे शाखेत तपासास घेतला.

सदर गुन्हयामध्ये आरोपीतांकडे सखोल तपास करुन आरोपीतांनी मिरा-भाईंदर,वसई-विरार आयुक्तलयाच्या कार्यक्षेत्रातील आचोळे पो. स्टे. गुन्हा रजि.नं. १३/२२, ११/२२, ६६/२१, ७१/२१ असे ०४, नालासोपारा पो.स्टे.गुन्हा रजि नं ४९२/२१, ४९१/२२ असे ०२, तुळींज पो.स्टे गुन्हा रजि नं ५९/२२ असा १ व विरार पो.स्टे.गुन्हा रजि नं १०७२/२१ असा १ असे एकुण ०८ सायलेन्सर चोरीचे गुन्हे व नवी मुंबई आयुक्तालयातील खारघर पोस्टे -०२, कौपरखैरणे पोस्टे - ०२, कामोठे पोस्टे – ०४ व रबाळे पोस्टे – ०२ असे एकुण १० गुन्हे हे अटक आरोपी व पाहीजे आरोपी सैबान यांनी मिळुन एकुण १८ सायलेन्सर चोरीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहेत. सदर गुन्हयातील सायलेन्सरचे पार्ट, सायलेन्सर चोरी करण्यासाठी आवश्यक साहीत्य व गुन्हे करण्यासाठी वापरलेली सेंट्रो कार असा एकुण ३,६६,०००/- चा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, सपोनि अमोल आंबवणे, सपोनि/दत्तात्रय सरक, सपोनि/नितीन बेंद्रे, पोउनि/कैलास सोनावणे, सफौ/चंद्रकांत पोशिरकर, पोहवा/१४९३ मते, पोहवा/२७२७ राणे, पोहवा/२७७३ तावरे, पोहवा/यादव, पोना/केंद्रे, पोना/१०३१ काळे, पोना/१६१० पाटील, पोअं/१८६७ वेल्हे, पोअं/३३७५ श्रीवास्तव, पोअं/३५०२ जगताप, पोअं./३५७९ सुशील पवार, पोअं/९५९ गायकवाड यांनी केलेली आहे.



मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण कक्ष
धनाजी क्षीरसागर
दहशतवाद विरोधी कक्ष
मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा